शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ११३ वा | गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क :
डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# शिंदेंनी मुख्यमंत्रिपदाचा दावा सोडला
# फडणवीसांचा मार्ग मोकळा, जरांगेंचा पुन्हा इशारा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुख्यमंत्रिपदाबाबत जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

एकनाथ शिंदे यांच्या या भूमिकेनंतर आता देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाल्याचं बोललं जात आहे. यावर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

**नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील ?**

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा दावा सोडला हा त्यांचा राजकीय विषय आहे, त्याच्यावर आम्ही बोलणे योग्य नाही, आम्ही आमच्याच कामात आहोत, येत्या रविवारी आम्ही तुळजापूर दर्शनासाठी जात आहोत. मुख्यमंत्री कोणीही होवो, आम्हाला त्याच्याशी



काही देणे घेणे नाही, परंतु मराठ्यांची एकजूट सरकारचा घाम फोडणारी आहे, कोणीही आले तरी आम्हाला सुख नव्हते, आम्हाला संघर्ष करावाच लागणार आहे. कोणीही मुख्यमंत्री झाले तरी आरक्षण घेणार, सुट्टी नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, यावेळी मी आणि माझा समाज मैदानात नव्हतो, माज्या समाजाने जे करायचे ते केले आहे, माज्या समाजाशिवाय राज्यात कोणाचीच सत्ता येऊ शकत नाही. मराठा समाज ताकतीने प्रत्येकाच्या पाठीशी उभा राहिला आहे, आता सरकारने मराठा समाजाच्या पाठीशी उभे राहून त्यांना आरक्षण मिळवून द्यावे, मस्तीत येऊ नये. आजकालचे सरकार भावनाशून्य आहे, त्यांना भावनेची किंमत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरक्षण बाबतीत काम केले आहे, पण आम्हाला पण लढावे लागले होते.

मराठ्यांना महाविकास आघडी आणि महायुतीकडून सहजा सहजी काहीही मिळालेले नाही.मुख्यमंत्री हे आरक्षणाबाबत काम करू शकले, आरक्षण मिळवून देऊ लागले, पण सत्य हे पण आहे आम्हाला सहजा सहजी मिळाले नाही. परंतु मुख्यमंत्री कोणाला करायचे हा त्यांचा विषय आहे. आम्ही आमच्या आमरण उपोषणाच्या तयारीला लागलो आहोत. 132 पेक्षा जास्त मतदार संघात 20 हजाराच्या आसपास महायुतीचे उमेदवार निवडून आलेले आहेत, तिथे मराठ्यांनी सभा लावली असती तर पूर्ण राख झाली असती. महायुती जास्त मतांनी निवडून आली म्हणजे आता तुमची जबाबदारी वाढली आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## EVM मध्ये घोटाळा झाल्याचा पहिला पुरावा कसा सापडेल ? असिम सरोदे टेक्निकली समजावणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात नुकतेच विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. या निवडणूक निकालाने सगळेच हैराण आहेत. महायुतीने तब्बल 230 पेक्षा जास्त जागा जिंकल्या आहेत. महाविकास आघाडीच्या वाट्याला फक्त 46 जागा आल्या आहेत. महत्त्वाच म्हणजे लोकसभेला मविआने सर्वाधिक 30 जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर सहामहिन्यात मतदारांचा कौल इतका कसा बदलू शकतो? असा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. महाविकास आघाडीचे नेते आणि पराभूत उमेदवार त्यांच्या पराभवाच खापर ईव्हीएमवर फोडत आहेत. पण आता या निकालाला आव्हान कसं द्यायचं? या संदर्भात प्रसिद्ध वकिल असिम सरोदे पराभूत उमेदवारांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यासाठी आज परिषदेच आयोजन करण्यात आलं आहे.



'जे पराभूत उमेदवार आहेत, त्यांना अशा पद्धतीने आपण पराभूत होऊ अशी अपेक्षा त्यांनी केली नव्हती. त्यांना स्वतःला आणि त्यांना मतदान करणाऱ्या सर्वांना निकालाविषयी शंका आहे. त्यांना निवडणूक याचिका करायची आहे. पण केवळ भावनिक बोलून चालत नाही. मतदारांना केवळ दुःख व्यक्त करुन चालणार नाही. त्यांच्या मनातला उमेदवार अशा पद्धतीने पडला. ते पराभूत होण चुकीच्या मार्गाने झालय असं त्यांना वाटतं. कोर्टात जायचं असेल तेव्हा न्यायालयीन प्रक्रिया योग्य पद्धतीने वापरणं, त्यासाठी कागदपत्रं देणं, कोणत्या आधारे केस करतोय, ते सांगाव लागेल' असं असिम सरोदे म्हणाले.

**याचिका कुठल्या आधारावर करता येते ?**

'निवडणूक याचिका ही साधारणपणे प्रामाणिकपणे निवडणुकीच आयोजन झालं नाही. भ्रष्ट मार्गांचा वापर झाला, एश्ट चा गैरवापर सुद्धा त्यात येतो. त्यासाठी डॉक्युमेंटेशन आवश्यक आहे' असं असीम सरोदे म्हणाले. 'लोकप्रतिनिधीत्व कायदा, आर्टिकल 226 नुसार निवडणूक याचिका कशी करु शकतो? याची परिषदेत माहिती देण्यात येईल' असं असीम सरोदे यांनी सांगितलं.

**तेव्हा घोटाळा झाला म्हणता येईल ?**

'ईव्हीएमबद्दल संशय व्यक्त केला जातोय. भाजपचे नेते लालकृष्ण अडवाणी, नितीन गडकरी यांनी ईव्हीएमबद्दल आक्षेप नोंदवले होते. ईव्हीएमबद्दल आक्षेप सार्वत्रिक आहेत, पण ते उघड कसे करायचे? हा कळीचा मुद्दा आहे. चोरी पकडता येत नाहीय. सर्वोच्च न्यायालयाने एका निकालात सांगितलं होतं, पाच टक्के व्हीव्हीपॅटची पडताळणी करता येईल, त्यासाठी किती पैसे भरावे लागतील. कसा अर्ज करायचा याची माहिती देऊ' असं सरोदे म्हणाले. 'ईव्हीएम मशीनमधल्या पाच टक्के मतांची व्हीव्हीपॅट स्लीपशी पडताळणी केल्यानंतर त्यात फरक दिसला, तर ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याच प्रथमदर्शनी म्हणू शकतो' असं असिम सरोदे म्हणाले.

## अकलूज येथे रयतेचा राजा-राजा शिवछत्रपती महानाट्याची जय्यत तयारी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दि.२ व ३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा – राजा शिवछत्रपती या महानाट्याच्या १२५ बाय ७० फुटाच्या भव्य व्यासपीठाचे व नटराज मुर्तीचे पूजन सयाजीराजे मोहिते–पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले. आजपासून महानाट्याच्या सरावास प्रारंभ झाला. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी सरावा वेळी भेट देवून आवश्यक त्या सूचना दिल्या.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती अकलूज, शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकूल, अकलूज येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या महानाट्यात छत्रपती चित्रपट कलावंत शंतनू मोघे, अभिनेत्री पल्लवी वैद्य, रवींद्र कुलकर्णी, अभिनेते विश्वजीत फडते यांच्यासह स्थानिक ९०० हून अधिक कलाकारांचा समावेश आहे. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अजय तपकिरे व सूत्रधार डॉ.विश्वनाथ आवड आहेत. यात घोडे, बैलगाड्या, पायदळ, मावळे दिसणार आहेत. या महानाट्यात शिव जन्मापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतच्या ऐतिहासिक घटनांचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या सहकार्यांच्या शौर्याची गाथा उलगडणार आहे. या दोन दिवसांच्या महानाट्यासाठी सुमारे एक लाखहून अधिक रसिक प्रेक्षक उपस्थित राहणार आहेत.

सहकार महर्षी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संग्रामसिंह मोहिते–पाटील, कु. स्वरुपाराणी मोहिते–पाटील, सयाजीराजे मोहिते–पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध कमिटी कार्यरत असून क्रीडा संकुल येथे याची जय्यत तयारी सुरु आहे. यावेळी सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे– पाटील उपस्थित होते.

## निवडणूक संपली सरकार आलं, आता तातडीने कर्जमाफी करा, शेतकऱ्यांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला असून महायुती पुन्हा एकदा सत्तेत आली आहे. तर महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला आहे. निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांनी महायुतीला सर्वाधिक मते देत सत्तेत आणले आहे.

सध्या मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत असणारे भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारामध्ये पुन्हा सरकार आल्यास संपूर्ण कर्जमाफी करू असं आश्वासन दिले होते. आता मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी झाल्यानंतर पहिल्याच कॅबिनेट बैठकीत कर्जमाफीचा निर्णय घ्यावा अशी मागणी आता शेतकऱ्यांकडून होत आहे.



मागील हंगामात दुष्काळ होता. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे. त्याचबरोबर शेतमालाला चांगला बाजारभाव न मिळाल्यामुळे कर्ज फेडू शकले नाही. त्यामुळे बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यास नकार देत आहेत. शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीची मागणी करत आहेत.


लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला होता. यामुळे महायुती सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल अशी आशा व्यक्त केली जात होती. मात्र सोयाबीनला हेक्टरी 5 हजार रुपये अनुदान, मोफत वीजबिल आणि लाडकी बहिण योजना या फायदेशीर योजना आणल्या.

निवडणुकीच्या प्रचारात महाविकास आघाडीने 3 लाखांपर्यंत कर्जमाफी देऊ असे आश्वासन दिले होते. त्यानंतर महायुतीनेही कर्जमाफी करणार करण्याचे आश्वासन दिले होते. आता राज्यात महायुती सरकार आले असून पहिल्या कॅबिनेटमध्ये कर्जमाफी करावी अशी मागणी होत आहे.

## यापुढे निवडणूक लढवणार नाही, भाजप उमेदवाराविरोधात कोर्टात जाणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात मध्य विधानसभा मतदारसंघात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार नरसय्या आडम यांचा दारुण पराभव झाला. नरसय्या आडम यांचा डिपॉझिट देखील जप्त झाला आहे. पराभवानंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उदय नारकर आणि नरसय्या आडम यांनी जाहीर पत्रकार परिषद घेत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारावर गंभीर आरोप केले आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी म्हणावी तशी कडक कारवाई केली नाही, त्यामुळे आम्ही निवडणूक अधिकाऱ्यांविरोधात हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात जाणार अशी प्रतिक्रिया दिली आहे. नरसय्या आडम यांनी बोलताना सांगितले, "यापुढे मी कोणत्याही प्रकारची

**नरसय्या आडम यांचा आक्रमक पवित्रा**



निवडणूक लढवणार नाही. ही माझी शेवटची निवडणूक होती. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आता नवीन चेहरा देणार आहे. उद्या जरी निवडणूका लागल्या तरी मी निवडणूक लढणार नाही".

**भाजपने प्रचंड अशी बदनामी केली**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सोलापुरातील मुख्य कार्यालयात मंगळवारी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी पत्रकार परिषद घेण्यात आली होती. पत्रकार परिषदेत पक्षाचे ज्येष्ठ नेते उदय नारकर, माजी आमदार नरसय्या आडम यांनी भाजप उमेदवार देवेंद्र कोठेंवर गंभीर आरोप केले आहे. "निवडणूक प्रचार सुरू असताना जातीपातीचे राजकारण केले, मंदिरात प्रचार केला, देव संकटात आहे असं सांगत मतदारांची दिशाभूल केली. ऐन निवडणूकीच्या पहाटे माझी वैयक्तिक बदनामी केली. एक पत्र व्हायरल करत माझी बदनामी केली. प्रचार काळात भाजपच्या वतीने चिकन बियार्णी तयार करून मतदारांना वाटण्यात आली. या सर्व बाबी आम्ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. तरी देखील कारवाई करण्यास विलंब करण्यात आला".

**उद्या जरी निवडणूका लागल्या तरी निवडणूक लढवणार नाही**

माजी आमदार नरसय्या आडम यांनी जाहीरपणे सांगितलं की, "यापुढे कोणत्याही प्रकारची निवडणूक लढवणार नाही. मी चळवळ मधील कार्यकर्ता आहे. कामगारांसाठी विस्थापितांसाठी सदैव काम करत राहणार. पण निवडणूक लढवणार नाही. उद्या जरी निवडणूका लागल्या तरी सुद्धा निवडणूक लढणार नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष नवीन चेहरा देईल. माझं वय देखील ८० वर्ष झालं आहे".

श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था, संचलित
शार्वी अभ्यासिका
दि. १५ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक अभ्यासिका
वैशिष्ट्ये
✓ वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
✓ शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
✓ प्रत्येक जागा आरक्षित
✓ मुलं-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था
✓ स्वतंत्र प्रसाधनगृह
✓ दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
✓ आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प प्रदुषणमुक्त वातावरण
✓ लॅपटॉप, मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट
✓ मर्यादित प्रवेश क्षमता
✓ वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन वाहन तळाची सोय
✓ वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत

पत्ता : एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.
संपर्क : (०२१७) २६०५०९१ /८८५६९२७९४७

## संपादकीय

# अस्वस्थ करणारा विलंब


महायुतीच्या दणदणीत विजयानंतरही या युतीला आपला मुख्यमंत्री आज 72 तास होऊनही निश्चित करता आला नाही. त्यामुळे नाहकच चल बिचल निर्माण झाली आहे. अति प्रचंड बहुमतानंतरही ही अनिश्चितता महायुतीसाठी शोभादायक नाही, असेच वातावरण सध्या निर्माण झालेले दिसते. वास्तविक 26 नोव्हेंबर रोजी विधानसभेची मुदत संपली. त्या मुदतीत सरकार स्थापन होईल अशी अटकळ बांधली जात होती. कोणत्याही परिस्थितीत 26 नोव्हेंबरपर्यंत नवे सरकार आणि विधानसभा अस्तित्वात यायला हवी होती, असे काही कायदेतज्ज्ञांचे म्हणणे पडले. पण त्या घटनात्मक तरतुदीलाही रीतसर फाटा दिलेला दिसतो. आज आणि कालच्या दिवसभराच्या घडामोडीनंतर संध्याकाळी भाजप विधिमंडळ पक्ष नेत्याची निवड होईल असे सांगितले गेले; पण तरीही मुख्यमंत्री कोण? हा विषय प्रलंबित ठेवण्यात आला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी आपापले गटनेते निवडले आहेत. दुर्दैवाने भाजपला गटनेता निवडायलाही विलंब झाला आणि भाजपचा गटनेता ठरल्यानंतर मुख्यमंत्रिपद कोणत्या पक्षाला द्यायचे हे ठरणार आहे. त्यामुळे हा विषय आणखी काही दिवस लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. शिवसेनेला एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री व्हावे असे वाटते आहे. तसा दबाव त्यांनी पहिल्या दिवसापासूनच कायम ठेवला. टप्प्याटप्प्याने त्यांनी हा दबाव वाढवत नेला.

दिल्लीतले काही खासदार आणि राज्यातील काही प्रमुख आमदार यांना त्यांनी याविषयी सतत बोलते ठेवले. कमी जागा निवडून आल्याने मुख्यमंत्रिपद मिळणार नाही असे होत नाही. कारण बिहारमध्ये भाजपने जो पॅटर्न राबवला तोच पॅटर्न या ठिकाणी राबवावा, असा मुद्दा शिवसेनेने पुढे केला आहे. बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या पक्षाला भाजपच्या तुलनेत अत्यंत कमी जागा मिळूनही भाजपने नितीश कुमार यांच्याकडे मुख्यमंत्रिपद कायम ठेवले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही तसेच करावे, असे शिवसेनेचे म्हणणे आहे. अर्थात स्वतः एकनाथ शिंदे याबाबत काहीही बोलत नसले, तरी त्यांनी आपल्या खास माणसांमार्फत माध्यमांपुढे मुख्यमंत्रिपदाचा आग्रह पद्धतशीर रेटला आहे. त्यामुळेच हा विलंब होतो आहे हे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस मात्र भाजपकडे मुख्यमंत्रिपद द्यायला राजी झाली आहे, असे सांगितले जात असले तरी त्यांनी अधिकृतपणे अशी भूमिका जाहीर केलेली नाही. मात्र अप्रत्यक्षपणे ते यासाठी राजी झालेले प्रसार माध्यमात तरी दिसतात. हा सगळा अशोभनीय प्रकार ठरला आहे. सरकारच्या विश्वासार्हतेविषयी त्यामुळे पहिल्या दिवसापासूनच अविश्वासाचे नाहक वातावरण तयार झाले आहे. वास्तविक, भाजपाचे नेतृत्व अत्यंत खमके असतानाही त्यांना येथे अस्ते कदम का चालावे लागत आहे याचे आश्चर्य वाटते. बहुदा मूळ शिवसेनेबरोबर मुख्यमंत्रिपदाबाबत जो घोळ झाला, असा घोळ यावेळी होऊ नये म्हणून बहुदा ते ताकही फुंकून पीत असावेत. कारण काहीही असले तरी 230 जागा मिळूनही जर मुख्यमंत्रिपदाचा पेच पहिल्या दिवसापासूनच निर्माण होणार असेल, तर या सरकारवर अनिश्चिततेची तलवार या पुढील काळातही कायम राहील, असे वातावरण महायुतीच्या नेत्यांकडूनच तयार केले गेले आहे ही दुर्दैवी बाब म्हणावी लागेल.

वास्तविक भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी केलेली व्यूहरचना आणि त्यांच्या प्रयत्नांना आलेले यश यामुळेच महायुतीला घवघवीत यश मिळाले असे वातावरण असल्यामुळे फडणवीस हेच पुन्हा मुख्यमंत्री होतील हे जवळपास सगळेच गृहीत धरून चालले होते. पण ज्या अर्थी अजून फडणवीस यांचे नावच जाहीर होऊ शकलेले नाही त्याअर्थी फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घालायला भाजपचे हायकमांड तयार नाही, असेही वातावरण तयार झाले आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांत भाजप पक्षश्रेष्ठींनी आयत्यावेळी भलतीच नावे मुख्यमंत्री म्हणून जाहीर केली तसाच काहीसा प्रयोग महाराष्ट्रात होईल अशी चिन्हे आज संध्याकाळपर्यंत तरी होती.

मध्यप्रदेशात तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली भाजपला घवघवीत यश मिळाले असतानाही त्यांना दूर सारून दुसऱ्याच नेत्याकडे मुख्यमंत्री पद दिले गेले होते हा अनुभव ताजा आहे. त्यामुळे फडणवीस यांचे भवितव्य आज संध्याकाळपर्यंत तरी टांगणीला लागलेले दिसले. वर नमूद केल्याप्रमाणे मुख्यमंत्रिपदाचा घोळ इतके प्रचंड बहुमत मिळाल्यानंतरही कायम ठेवणे भाजपलाही शोभणारे नाही. याआधी महाराष्ट्रात मुख्यमंत्री निवडीला महिना कालावधी लागला असा दाखला पुढे केला जात असला, तरी तत्कालीन परिस्थिती वेगळी होती तशी आजची महाराष्ट्रातील परिस्थिती नाही. त्यामुळे नेता निवडीचा तुलनेने सोपा असलेला विषय भाजपच्या नेत्यांनी नाहक अवघड करून टाकला आणि आपल्याच सरकारविषयी विश्वासाचे आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण केले असे म्हणता येते. ही अनिश्चितता महायुतीला समर्थन देणाऱ्या जनतेलाही फारशी आवडलेली नसावी. भाजपाच्या हाय कमांडने असा घोळ घालून नेमके काय साध्य केले त्याचा अंदाज लागत नाही. महाराष्ट्राच्या बाबतीत अधिक विश्वासाने आणि तातडीने निर्णय घेऊन सरकारविषयी लोकांच्या मनात विश्वासाचे वातावरण त्यांनी निर्माण करणे अपेक्षित होते. पण त्यांना ते जमलेले नाही. आणि मुळात 26 तारखेला विधानसभा किंवा सरकार अस्तित्वात येण्याची जी अपेक्षा होती त्याला बगल दिल्याने कायदेशीर संकटही उद्भवू शकते. विलंबाने अस्तित्वात आलेल्या विधानसभेला कदाचित कायदेशीर बाबींच्या आधारावर कोर्टातही आव्हान दिले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# महात्मा जोतीराव फुले



भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।।' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।
मतिविना नीती गेली।
नितीविना गती गेली ।
गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कायार्ला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# स्त्रियांना लाभले । पंख स्वतंत्र्याचे

महात्मा फुले जसे आद्य समाजक्रांतिकारक होते. पुसेच ते आद्य समाजसुधारकही होते आणि त्यांच्या कायार्च मूळ त्यांच्या आद्य प्रबोधनकारक वैचारिक भूमीत होतं. म्हणूनच त्यांच्या वैचारिक, परखड साहित्याचा मागोवा घेण्याची, तदनुषंगाने वाटचाल करण्याची आवश्यकता आजही आहे. महात्मा फुले यांनी जो नवविचारांचा प्रवाह महाराष्ट्रात आणला, तो पारंपरिक भारतीय विचारांहून वेगळा होता तसेच तो पाश्चिमात्त्य व्यक्तिस्वातंत्र्यवादी चळवळींवर आधारलेला होता. माणसाने माणसांच्या गुलामगिरीत राहावं, कोणी उच्च आणि कोणी नीच मानला जावा, स्वभावाने स्वतंत्र आणि मानवतावादी असणाऱ्या जोतिरावांना सहन होणं शक्यच नव्हतं म्हणून त्यांनी इंग्लंडमध्ये स्कॉटिश मिशनऱ्यांनी जशी मानवतावादी चळवळ चालू केली होती, तशी भारतात चालू केली आणि त्यांच्या या महान कायार्तूनच आजचा नवमहाराष्ट्र उदयास आलाय.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेने ब्राह्मणांना सर्वप्रकारची मोकळीक दिली, परंतु क्षत्रिय, वैश्य, शूद्रांना सर्व बाजूंनी करकचून बांधून ठेवलं. ब्राह्मणांचं सर्वाधिकारीपण नाकारल्याशिवाय समाज मुक्त होऊ शकणार नाही, हे लक्षात येताच महात्मा फुल्यांनी विचार आणि कृतीद्वारे समानतेची प्रचंड चळवळ निर्भयपणे सुरू केली. विचारवंत लेखक वि. द. घाटे म्हणतात, 'ब्राह्मणेतर जनता ब्राह्मणांच्या धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीत खितपत होती. हे फुल्यांना पाहावलं नाही. त्यांनी या गुलामगिरीविरुद्ध मोहीम पुकारली. महात्मा फुले यांच्या या सुधारणावादी चळवळीत स्वतः ब्राह्मण असणारे रा. ब. गोपाळ हरी देशमुख तथा लोकहितवादीही सामील झाले होते. ब्राह्मण्यावर ज्यांचा राग होता, ते सारे म्हणजे-कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा. ब. गोवंडे, न्यायमूर्ती रानडे, रा. ब. विष्णू मोरेश्वर भिडे, विष्णुशास्त्री पंडित ही मंडळी महात्मा फुले यांना सर्वतोपरी मदत करीत होती. महात्मा फुले यांच्या शिक्षण संस्थांचे खजिनदार परांजपे हे ब्राह्मणच होते. पण आज वर्णाभिमानरहित, समतावादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी, फुले यांच्या तत्त्वज्ञानाचे प्रचारक-प्रसारक तथाकथित उच्चवर्णीय अभावानेच आढळतात.'

महात्मा फुले यांनी सर्वजनहितकारी असा सार्वजनिक सत्यधर्म सांगून समाजाला धार्मिक रूढी, कर्मकांडं आणि परंपरा यातून मुक्त करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. बहुदेववादी हिंदू समाजाला 'निर्मिक' सांगून एकेश्वरवादी वळण लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचा हा निर्मिक निर्गुण, निराकार आहे आणि त्याला बाह्योपचारी भक्तीची आवश्यकता नाही. त्याला मंदिर लागत नाही, म्हणूनच तो भट, पुरोहित, पुजारी, पंडे, बडवे अशा मध्यस्थाशिवाय भजला जातो. सनातन, हिंदू धमार्ला असं नवं वळण लावण्याचं क्रांतिकारी कार्य जोतिरावांच्या नवमानवतावादाची ओळख पटवून देणारे आहे.

महात्मा फुले यांनी शिक्षण हेच सर्व सुधारणा आणि सुव्यवस्थेचं मूळ आहे, हे जाणलं म्हणूनच त्यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणकार्याला गती देण्याचं कार्य जन्मभर निष्ठापूर्वक केलं. १८८२च्या हंटर शिक्षण आयोगाने Filter down Theory - अर्थात, पाझर सिद्धान्ताने भारतीय शिक्षण देण्याची केलेली सूचना त्यांनी फेटाळली आणि ह्या सिद्धान्तातील मूलभूत दोष दाखवले. शिक्षणतज्ज्ञ वि. द. घाटे लिहितात, 'त्यांनी कमिशनला ठणकावून सांगितलं, तुम्ही शिक्षणाची उभारणी खालून वर अशी करा. आमच्याकडे जातिभेद आहेत. आमचा समाज एकसंध नाही. वरच्या लोकांनी ज्ञानगंगेचं पाणी आजवर अडवलं असून खालच्या लोकांना ते मिळू दिलेलं नाही. तसंच बहुजनसमाजासाठी निदान बारा वर्षांच्या वयापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचं करा.' महात्मा फुले यांनी बहुजन समाजाचा जसा कैवार घेतला, तसाच स्त्रीवर्गाचाही कैवार घेतला आणि शिक्षणाशिवाय त्यांची गुलामगिरीतून सुटका होणं कधीही शक्य नाही, हे ओळखून १८५१ साली पुण्यात पहिली मुलींची शाळा स्थापन केली. या त्यांच्या कायार्च कौतुक करताना मामा परमानंद म्हणतात, 'त्या विपरीत काळात आपल्या पत्नीला सुशिक्षित करतो आणि तिच्याद्वारे ब्राह्मणांच्या मुलींना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करतो. तेही कुठे? त्या लोकांच्या बालेकिल्ल्यात. महार-मांग या वगार्तील लोकांसाठी शाळा स्थापन करून त्या चालवणं व इतर समाजबंधूंच्या बरोबरीने त्यांना वागवणं म्हणजे सिंहाच्या गुहेत शिरून त्याची आयाळ पकडण्यासारखंच होतं.' क्रांतिज्योती सावित्रीबाईंचंही त्यांनी खूप कौतुक केलं आहे. त्यांच्या त्यागाचं आणि समाजभक्तीचं वर्णत करताना मामा परमानंद म्हणतात, 'ह्या उभयतांनी लोककार्यार्थ आपलं सारं जीवन खर्च केलं.'

२८ नोव्हेंबर (१८९०) हा महात्मा फुले यांचा स्मृतिदिन. महाराष्ट्रातील अनेक विचारवंत हा स्मरणदिन शिक्षकदिन म्हणून साजरा केला जावा, या इच्छने प्रेरित झाले आहेत. कारण, जोतिराव हेच आद्य शिक्षण प्रसारक आहेत. म्हणून लक्षात घ्या-

आद्य शिक्षकाचा । मान जोतिबांना
राष्ट्र वंदी त्यांना आदराने ॥१
उगवला ज्ञान सूर्य । कृपा झाली त्याची
वाट विकासाची । दिसे लोका ॥२
ज्ञान सूर्य त्यांच्या। कष्टाने उदेला
दूर अज्ञानाला । केले त्याने ॥ ३
ज्ञानाने कळाली । प्रगतीची दिशा
युगांची निराशा । दूर झाली ॥४
गुलामांना दिले। ज्ञानचक्षु त्यांनी
लाभे दास्यातुनी। मुक्ती जना ॥५
स्त्रियांना लाभले। पंख स्वातंत्र्याचे
पिता जोतिबांचे। कार्य थोर ॥६
अस्पृश्यता दूर। पळे शिक्षणाने
मुक्त झाली । मने दबलेली ॥७
जोतिराव पिता। माता, बंधू, सखा
थोर त्यासारखा। नाही कुणी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# 'पुरुष पण भारी देवा' लवकरच आपल्या भेटीला

जागतिक महिला दिन जसा 8 मार्चला साजरा केला जातो, त्याचप्रमाणे 19 नोव्हेंबरला 'जागतिक पुरुष दिन' साजरा केला जातो. पण हे अनेकांना माहिती नसावं. यासाठीच १९ नोव्हेंबरच्या 'आंतरराष्ट्रीय पुरुष दिना' निमित्ताने आम्ही केली.

एक Documentary फिल्म (माहितीपट) आणि त्या फिल्म चे नाव आहे, "पुरुष पण भारी देवा".

आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीत आणि प्रसंगानुरूप कणखर राहून, आपल्या मुलाबाळांना, कुटुंबाला सुख-समाधानात ठेवणं, हेच असतं प्रत्येक पुरुषाचं ध्येय. पण ह्या ध्येयाकडे प्रवास करत असतानाच, 'त्या' च्या मनात होणारी घालमेल आणि संवेदना याची मांडणी केली आहे "पुरुष पण भारी देवा" या माहितीपटात...

यामध्ये स्त्री आणि पुरुष यांना समान पातळीवरच आपण पाहणार आहोत कोणताच भेदभाव आम्ही केलेला नाही ...

पुरुषांना माणूस म्हणून समजावून घेऊन त्यांच्या अंतर्गत डोकावून पाहण्यासाठीचा आम्ही केलेला एक छोटासा प्रयत्न आहे...

नक्कीच या माहितीपटाच्या




माध्यमातून आपल्याला "त्या" च्या मनातील व्यथा आणि संवेदना समजतील हीच माफक अपेक्षा...!

'पुरुष पण भारी देवा' या माहितीपटाचे पोस्टर आज अनावरण करताना आणि हा विषय सर्व रसिक मायबाप प्रेक्षकांपुढे ठेवताना, आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

आजीवन संघर्ष आणि मेहनत करणाऱ्या सर्व पुरुषांना 'पुरुष दिन' च्या हार्दिक शुभेच्छा.

आजचा दिवस आपल्या कर्तृत्वाचे, कार्यशक्तीचे आणि धैर्याचे कौतुक करण्याचा दिवस आहे.

'पुरुष पण भारी देवा' लवकरच आपल्या भेटीला येतोय...

निर्मिती, संकल्पना आणि लेखन - ऋत्विज चव्हाण

दिग्दर्शन आणि संकलन - सचिन अशोक जगताप

छायाचित्रण - संदीप चौहान

संहिता पुनर्लेखन - श्रुती कुलकर्णी - पात्रुडकर

निवेदन - स्नेहांकिता देवगेकर - घाटगे

ऋत्विज चव्हाण
व्यवस्थापक हॉटेल अंजठा
चित्रकार व लेखक
Mob - 8380800083
सचिन जगताप
Director- Film Editor
Motion Film Studio
Mob - 9822092303

नोट - रसिक हो आपल्याला देखील या माहितीपटात काही मुद्दे बोलायचे, सांगायचे असतील तर नक्कीच आपण आम्हांला संपर्क करू शकता.

# विकासाचा विचार करताना पर्यावरण रक्षणाबद्दल दुराग्रही भूमिका नको - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** देशाच्या प्रगतीसाठी तसेच सर्वसामान्यांच्या हितासाठी विकासासोबतच पर्यावरण रक्षणही महत्त्वाचे आहे. मात्र पर्यावरण रक्षणाबाबत अनेकदा दुराग्रही भूमिका घेतली जाते. पर्यावरण आणि विकास यामध्ये समन्वय असला पाहिजे, पर्यावरणाबाबत दुराग्रही भूमिका नसावी, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

'पर्यावरणासाठी जीवनशैली : शाश्वत विकासासाठी भारतीय दृष्टिकोन' या विषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, मुंबई येथील सभागृहात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

चर्चासत्राचे आयोजन गोवर्धन इको व्हिलेज संस्थेने 'कोटक स्कूल ऑफ सस्टेनेबिलिटी', नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, एनआयटी वारंगल आदी संस्थेच्या सहकार्याने केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पर्यावरण रक्षणाला प्राधान्य दिले आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती वाढविण्यासाठी तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. मात्र कधी-कधी पर्यावरण विषयांवर ताठर भूमिका घेतली जाते. दक्षिण भारतातील एका मार्गावरील चार झाडांच्या रक्षणासाठी न्यायालयात याचिका दाखल केली गेली. या महामार्गावर पंधरा वर्षात जवळजवळ तीन हजार लोकांचे बळी गेले, असे सांगून चार झाडे कापणे आवश्यक असेल तर त्याऐवजी २५ नवी झाडे लावण्यासारखी सकारात्मक अट घातली गेली पाहिजे, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

देशात जलसंवर्धन व नदीजोड प्रकल्पांचे काम झाल्यास देशातील अन्नधान्याचे उत्पादन अनेक पटींनी वाढेल व भारत संपूर्ण जगासाठी अन्नधान्य उत्पादन करू शकेल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

भारतीय संस्कृतीमध्ये नदी, पर्वतराजी व वृक्षवल्लीची पूजा केली जाते. आपण निसगार्चे व नैसर्गिक संपदेचे मालक नसून विश्वस्त आहोत ही भूमिका भारतीय विचारातून अधोरेखित केली जाते. वसुंधरा आपल्या विविधतेसह पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी गोवर्धन इको व्हिलेजचे संचालक गौरांग दास यांनी भारतीय विचारधारेतील पाण्याचा, अन्नधान्याचा व ऊजेर्चा जबाबदारीने विनियोग याबाबतचे चिंतन यावर भाष्य केले तसेच प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या आव्हानाबद्दल चिंता व्यक्त केली.

उद्घाटन सत्राला भारतीय नदी परिषदेचे सदस्य, 'रिव्हर मॅन ऑफ इंडिया' रमण कांत तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## वात्रटिका

### काळजीवाहू

कितीही जुळविले तरी
गणित काही जुळत नाही...
खांद्यावर हात मित्राचा पण
पोटात काय ते कळत नाही...
व्हाडी आले, मंडप सजला
पण नवरदेवाचा पत्ता नाही...
काळजीवाहू काळजीत पडले
खुर्ची आहे पण सत्ता नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# वाहन वितरकांच्या स्तरावरच होणार हलक्या मालवाहू वाहनांची ऑनलाईन नोंदणी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** हलक्या मालवाहू वाहनांची नोंदणी फेसलेस (चेहरा विरहित) स्वरूपात वाहन वितरक यांच्या स्तरावरच ऑनलाईन पद्धतीने करण्याची सुविधा २८ नोव्हेंबरपासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यभरातील सर्व परिवहन कार्यालयांसाठी ही सुविधा कार्यान्वित असणार आहे. तसेच ही सुविधा सर्व संबंधित वाहन वितरकांकडे उपलब्ध असणार आहे.

ही सेवा पूर्णपणे फेसलेस (चेहरा विरहित) स्वरुपाची असून वाहन वितरकास त्यासाठी www.parivahan.gov.in या संकेतस्थळावर वाहन मालकाचा वाहन नोंदणी अर्ज करावा लागणार आहे. तसेच वाहन नोंदणी शुल्क व वाहन कराचा भरणा करून नोंदणी करता येणार आहे.

सद्यस्थितीत खाजगी वाहनांच्या नोंदणीप्रमाणेच हलक्या मालवाहू वाहनांची नोंदणी या सुविधेमुळे वाहन वितरकांकडे करता येणे शक्य होणार आहे. त्यामुळे आता हलकी मालवाहू वाहने, यापुढे परिवहन कार्यालयात नोंदणीसाठी आणण्याची आवश्यकता राहणार नाही व नोंदणीची प्रक्रिया विनासायास होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वाहन धारकांच्या वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. वाहन वितरकांस काही तांत्रिक अडचण आल्यास त्यांनी dytccomp.tpt-mh@gov.in येथे ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

तरी, सर्व नागरिकांनी व संबंधित वाहन वितरकांनी याची नोंद घेऊन, त्याप्रमाणे कार्यवाही करावी व सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी केले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

## 17 होड्या नष्ट , एक ट्रॅक्टर जप्त



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे पंढरपूर येथील भीमा नदीपात्रात वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या 17 लाकडी होड्या कटरच्या साह्याने नष्ट केल्या तर अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात ट्रॅक्टर यारीसह जप्त करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. दि. 26 नोव्हेंबर 2024 रोजी पंढरपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणारा ट्रॅक्टरवर कारवाई केली असून, सदर ट्रॅक्टर यारीसह जप्त करण्यात आला आहे. तसेच दिनांक 27 नोव्हेंबर 2024 रोजी पंढरपूर, इसबावी, शिरढोण, चिंचोली भोसे दरम्यान असणाऱ्या भीमा नदी पात्रात वाळू चोरी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या एकूण 12 लाकडी होड्या कटरच्या साह्याने कापून नादुरुस्त करून नष्ट करण्यात आल्या आहेत, तसेच चळे येथे वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या 05 लाकडी होड्या जेसीबीच्या साह्याने नष्ट करण्यात आल्या आहेत.

या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, प्रमोद खंडागळे , महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे व पंढरपूर शहरचे पोलीस कर्मचारी सहभागी होते.

# मसिहा सामजिक बहुद्देशीय संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मसिहा सामजिक बहुद्देशीय संस्थेच्या वतीने दर वर्षाप्रमाणे ह्या वर्षी देखील संस्थेने २६/११ दहशतवादी हल्ल्यात देशाच्या संरक्षणार्थ शहिद झालेल्या देशाच्या सुपुत्रांच्या स्मरणार्थ व संविधान दिवस निमित्त रक्तदान शिबिर दि. 26/11/2024 रोजी, मसिहा चौक, सकाळी 8.00 ते संध्याकाळी 5.30 पर्यंत मसिहा चौक मोदी, सोलापूर येथे तसेंच सोलापुर ब्लड बँक हयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते.

सदर शिबीरा अंतर्गत गरीब व गरजवंताना वर्षभरामध्ये संस्थेच्या वतीने विनामूल्य रक्ताचे पँकेट्स पुरवले जातात.

शिबीराची सुरूवात ( आनंद थिटे (Api) व नगरसेविक कामिनी आडम, रणजीत भंडारे) हस्ते शहिदांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन करण्यांत आले.

संस्थेचे संस्थापक अमित मंचले ह्यांनी सदर शिबीरात ह्या वर्षीदेखील रक्त संकलनाचा नवा उच्चांक 275 आपण गाठु शकलो अशी माहिती दिली व सदर शिबीर यशस्वीरित्या पारपडण्यास कारणीभुत सुरेश फरड, सुनील काडे, अजय भंडारी, प्रमोद कुरकल्ली, रवी भंडारे टायसन जगले, संपत जंगम, महेश कंपली, संजय साळवे, टोनी जगले, सिमोन परमपोगुल, जॉन्सन रामजीते, नाथन बुरले, सिमोन पोगुल, गौतम जगले, राजु बळगेरी तसेंच सोलापुर ब्लड बँक मसिहा तरूण मंडळ, सहकारी मित्रवर्ग,व सर्व रक्तदात्यांचे मनःपुर्वक आभार मानले.

# समाज कल्याण विभागाच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दि. 26 नोव्हेंबर रोजी ह्यासंविधान दिना निमित्ताने सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चौक, सोलापूर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून, संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन व संविधान अमृत महोत्सव वर्ष 2024-25 ''घर घर संविधान'' अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच संविधानाबाबत शाहीर सुरेश खाडे यांनी पोवाडा गायना करून, विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त सोलापूर महानगरपालिका मा. संदीप कारंजे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे सहायक संचालक श्रीमती मनिषा फुले, शासकीय वसतीगृहाचे गृहपाल व विद्यार्थी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील कर्मचारी, जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालय, विविध आर्थिक विकास महामंडळे यांचे अधिकारी व कर्मचारी, तालुका समन्वयक तसेच समतादूत व मान्यवर उपस्थित होते. अशी माहिती सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी दिली.

# २६/११ निमित्त कोन्हेरी येथे सामाजिक उपक्रमांचे आयोजन

## नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणाची आहुती दिलेल्या शहिदांच्या स्मरणार्थ आर. जे सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या सामाजिक उपक्रमात मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी येथे १७७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यासह आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये आरोग्य शिबिरामध्ये १६० नागरिकांनी भाग घेतला.

मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी येथे प्रत्येक वर्षी २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणाची आहुती दिलेल्या शहिदाच्या स्मरणार्थ विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. याच पार्श्वभूमीवर यावर्षी रक्तदान शिबिर, आधार कार्ड कॅम्प व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत १७७ जणांनी सहभाग नोंदवला. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. यासह आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ईसीजीसह शुगर, बीपी, तसेच सर्व रक्तांच्या तपासणी करण्यात आल्या. यामध्ये १६० नागरिकांनी सहभाग नोंदवला तर आधार कार्ड काम मध्ये ५४ आधार कार्ड काढण्यात आले. यावेळी प्रशासनातील तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी भेटी देत या सामाजिक संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

प्रारंभी माजी सैनिक हरिदास माळी, ज्ञानोबा गायकवाड, मारूती माने, श्रीमंत शेळके, बाबुराव शेळके, संतराम जरग, शिवाजी गाडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी रामदास जरग, राजकुमार पाटील, परमेश्वर माने, राजकुमार पांढरे, दत्तात्रय माने, राजाराम जरग, भिमराव कौलगे, सत्यवान शेळके, दशरथ रंदवे, अंगत शेळके, सलीम मुजावर, बालाजी कदम, दत्ता मुळे, बाळासाहेब शेटे, महादेव माने, दीपक जरग, अशोक शेळके, संदीप जरग, महेंद्र जरग, अविनाश सुतार, दीपक कुंभार, प्रतापसिंह जरग, नहेश शिंदे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत संविधान दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रस्ताविकेच्या शिलालेखास अभिवादन करताना अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादीन शेळकंदे, डेप्युटी सीईओ अमोल जाधव, हरिदास हावळे, संजय धनशेट्टी, संतोष कुलकर्णी, कादर शेख, सुलभा वठारे, जि.प. पत्रकार संघ अध्यक्ष शेखर गोतसुर्वे,राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, जिल्हाध्यक्ष तजमुल मुतवली, चेअरमन डॉ. एस. पी. माने, कास्टराईब कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष गिरीश जाधव, लिपिकवर्गीय संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, उप अभियंता उंबरजे, अभिमन्यू कांबळे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव विलास मसलकर, विशाल घोगरे, महिला कार्याध्यक्ष स्वाती स्वामी गोदावरी राठोड, सविता काळे, मृणाली शिंदे, आरती माडेकर, संतोष शिंदे, राकेश सोडडी, श्रीशैल देशमुख, डॉ. एस. पी. माने, महानंदा कुंभार, कल्याणी माने, नंदिनी पुजारी,चेतन वाघमारे, जाफर शेख, हरिभाऊ देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन शिवरत्न सभागृहात शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख यांच्या समवेत अधिकारी कर्मचारी यांनी केले.

### अनेक वर्षापासून युनियनचा उपक्रम

जिल्हा परिषद मुख्यालय परिसरातील भारतीय संविधान दिना निमित्त फूलांची सजावट करून संविधान उद्देशिका सजाविण्यात येते. गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियनच्या वतीने उपक्रम करण्यात येते.

# एका दिवसात तीन ठिकाणचे अतिक्रमण काढले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर थंड पडलेली महापालिकेची अतिक्रमण हटाव मोहीम पुन्हा जोमात चालू झाली आहे. मंगळवारी (दि. २६) शहराच्या विविध भागांत मोहीम घेत दोन खोकी, चारचाकी गाड्यांसह लोखंडी साहित्य जप्त केले. मंगळवारी सकाळच्या सत्रात महापालिकेच्या दाराशा हॉस्पिटलच्या कंपाऊंडलगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले होते. दाल चावल विक्रेत्यांनी कट्टा बांधून आपला बेकायदा व्यापार चालू ठेवला होता. ते अतिक्रमण जेसीबीच्या साहाय्याने काढण्यात आले, तर सिमेंटचा कट्टा जमीनदोस्त केला. लोखंडी टेबल, गॅस टाकी इतर साहित्य जप्त केले.

दुपारच्या सत्रात महिला हॉस्पिटल येथील फळगाड्यांचे अतिक्रमण काढले. वैष्णवी प्लाझा, जुळे सोलापूर येथील रस्त्यावरील बेकायदा खोक्यांचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत दोन लोखंडी खोकी. चारचाकी हातगाड्या चार, लोखंडी वजनकाटे व स्पिकर हे साहित्य जप्त केले. महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशाने अतिक्रमण विभागप्रमुख हेमंत डोंगरे,तुफियान पठाण, मुतूज शहापुरे यांनी ही मोहीम पोलिस बंदोबस्तात यशस्वी केली.

# बार्शी विधानसभा मतदारसंघ मतदान

| बूथ क्र. | गावाचे नाव | राऊत | सोपल |
|---|---|---|---|
| १५४ | उपळाई (ठो) | ५८३ | ३६९ |
| १५५ | उपळाई (ठो) | ४८१ | ४४५ |
| १५६ | उपळाई (ठो) | ४५९ | ४४६ |
| १५७ | उपळाई (ठो) | ४०७ | ३६१ |
| १ | पिंपळगाव धस | ४१० | ३६८ |
| २ | पिंपळगाव धस | ३८२ | ३२० |
| २८ | देवगाव | ४०२ | ३९८ |
| २९ | देवगाव | २९९ | ३५५ |
| १५३ | नागोबाचीवाडी | ४६९ | ३१६ |
| ३१ | लक्ष्याचीवाडी | ११६ | २२३ |
| ३० | कांदलगाव | ६१८ | ३१९ |
| २६ | ताडसौंदणे | ४९५ | ३२० |
| ३३ | गाताचीवाडी | ३०५ | २७४ |
| ५९ | फफाळवाडी | ३९२ | २८४ |
| २७ | शेलगाव व्हळे | ३५१ | ३०८ |
| ३२ | गाडेगाव | ३९४ | २४५ |
| ३ | खडकलगाव | ४९७ | ४८ |
| २५ | वेलगाव | २८६ | २१५ |
| ३४ | भोयरे | २३२ | १९० |
| २७१ | मालवंडी | ३३५ | ४८३ |
| २७२ | मालवंडी | ५१२ | ५१९ |
| २७३ | मालवंडी | ४१० | ३६५ |
| २०९ | वांगरवाडी | ४५१ | २८७ |
| २१० | तावरवाडी | १६३ | ७२ |
| १५८ | शेंद्री | ५४८ | ३४१ |
| १५९ | शेंद्री | ५१५ | ४०५ |
| २११ | भोईंजे | २१९ | २८७ |
| २१२ | भोईंजे | ४०५ | २९३ |
| २१३ | श्रीपतपिंपरी | ३६७ | ३४० |
| २१४ | श्रीपतपिंपरी | ४५० | ३८० |
| २१५ | श्रीपतपिंपरी | ३३६ | ३५४ |
| २७४ | तुर्कपिंपरी | ३६५ | ३५९ |
| २१६ | गुळपोळी | ४३४ | २७७ |
| २१७ | गुळपोळी | ४९६ | २८७ |
| २६८ | सुर्डी | ४२४ | ३५५ |
| २६९ | सुर्डी | ४४४ | ३१३ |
| २७० | सुर्डी | ४२४ | २९८ |
| १९६ | पानगाव | २३३ | २८१ |
| १९७ | पानगाव | २७३ | ३४६ |
| १९८ | पानगाव | ३७८ | ३३४ |
| १९९ | पानगाव | २२२ | २२७ |
| २०० | पानगाव | ४३० | ४९२ |
| २०१ | पानगाव | १७१ | ३०८ |
| २०२ | पानगाव | २६१ | २७० |
| २०६ | कोरफळे | ४४३ | ४१६ |
| २०७ | कोरफळे | ३८१ | ४१७ |
| २०८ | कोरफळे | ४५१ | ३४० |
| २०४ | कव्हे | ३१४ | २९३ |
| २०५ | कव्हे | ३५८ | ३९६ |
| १६४ | कासारवाडी | २६५ | २८४ |
| १६५ | कासारवाडी | ३२१ | २२९ |
| १६७ | बळेवाडी | १८६ | २१८ |
| १६० | खांडवी | ४२४ | ३८३ |
| १६१ | खांडवी | ४५७ | ३९७ |
| १६२ | खांडवी | ४१७ | ३९३ |
| १६६ | गोडसेवाडी | १४४ | १०८ |
| १६३ | अलिपूर | २३९ | १८४ |
| ३०३ | गौडगाव | ३७३ | ३९२ |
| ३०४ | गौडगाव | ३३८ | ४०१ |
| ३०५ | गौडगांव | २९१ | ५१३ |
| २३६ | तांबेवाडी | २१२ | २३२ |
| २३७ | तांबेवाडी/ लमाणतांडा | ५५८ | ३१८ |
| २३८ | भातंबरे | २५३ | ४४४ |
| २३९ | भातंबरे | ३५३ | ३१४ |
| २४० | भातंबरे | ५९६ | ३६२ |
| २९१ | बोरगाव झा. | २४२ | २०७ |
| २९३ | झाडी | ४४९ | ३०३ |
| २९२ | झरेगाव | ४३९ | ५२६ |
| २९८ | निंबळक | २२० | २२१ |
| ३०१ | रूई | ४६२ | ३०९ |
| ३०२ | रूई | २५२ | ३१३ |
| ३०८ | भालगाव | ४५२ | ३२० |
| ३०९ | भालगाव | ४०५ | ३५७ |
| ३०६ | संगमनेर | २५७ | २४३ |
| ३०७ | रऊळगाव | ३११ | ३४५ |
| ३३२ | आळजापूर | ३३४ | २०६ |
| ३३३ | मिर्झनपूर | २२९ | २३१ |
| २६३ | मानेगाव | ४४४ | ३९६ |
| २६४ | मानेगाव | ३४४ | ३१६ |
| २८५ | रातंजन | २३८ | २४७ |
| २८६ | रातंजन | २३३ | २०७ |
| २८८ | हळदुगे | २७७ | २७९ |
| २८९ | हळदुगे | ३०३ | २२२ |
| २४७ | लाडोळे | ४१४ | ५१९ |
| २४६ | नांदणी | ५२० | ४६२ |
| २२६ | पिंपरी पा. | ३२१ | ५५९ |
| २२७ | पिंपरी पा. | ३४३ | ५२० |
| २२२ | घाणेगाव | ३८२ | ४०० |
| २२३ | घाणेगाव | ३७० | ४८८ |
| २४५ | हिंगणी पा. | २८४ | ४५९ |
| २९९ | मालेगाव | ३१८ | ३१५ |
| ३०० | मालेगाव | ३६३ | २४८ |
| २८७ | मुंगशी आर. | २९९ | ४१६ |
| २९४ | उपळे दु. | ४१२ | ५४२ |
| २९५ | उपळे दु. | ४९९ | ३७६ |
| २९६ | उपळे दु. | ४०८ | ३९३ |
| २९७ | उपळे दु. | २९५ | ३८६ |
| १८६ | चिखर्डे | ४१६ | ४३९ |
| १८७ | चिखर्डे | ३१६ | ३४३ |
| १८८ | चिखर्डे | २५७ | २६८ |
| २३१ | नारी | २६८ | ४६३ |
| २३२ | नारी | ३५५ | ३२८ |
| २३३ | नारी | ४५८ | ३८६ |
| २३४ | नारीवाडी | ३३४ | २१६ |
| २३५ | इंदापूर | ३३२ | २८९ |
| २४२ | सावरगाव | ३५८ | ४७० |
| २४१ | कापसी | २२८ | २५७ |
| २९० | पिंपरी आर. | २४७ | ४०४ |
| २४३ | जामगाव पा. | ३९९ | १९५ |
| २४४ | जामगाव पा. | ३४० | ३३७ |
| १७२ | खामगाव | ३५९ | ४९२ |
| १७३ | खामगाव | ४०८ | ५९० |
| ४३ | उक्कडगाव/वाघाचीवाडी | ४८८ | ४३७ |
| ४४ | उक्कडगाव/वाघाचीवाडी | ४६८ | ४५८ |
| ५४ | धोत्रे | ३५४ | २१६ |
| ५५ | धोत्रे | २३० | २२९ |
| १७७ | चिंचोली | ३०८ | ३४० |
| १७५ | ममदापूर | ४६१ | ३४८ |
| ४५ | पांढरी | ४८९ | ३०५ |
| १७८ | घोळवेवाडी/ढेंबरेवाडी | ४८६ | ३५९ |
| १७४ | पिंपळगाव दे. | २२५ | १३६ |
| १७६ | जहनपूर | ११९ | १५७ |
| १८३ | गोरमाळे | ३१५ | ३८७ |
| १८४ | गोरमाळे | ३८२ | २७४ |
| १८५ | येळंब | २४० | ३२६ |
| ५३ | पुरी | ३९४ | ३६३ |
| ५१ | घारी | ४७९ | ३८१ |
| ५२ | घारी | ३३२ | २९९ |
| १७९ | कारी | ३५८ | ३६९ |
| १८० | कारी | ४३० | ३२६ |
| १८१ | कारी | ५१० | ४९६ |
| १८२ | कारी | ३७८ | ३४५ |
| १९२ | बावी आ. | ४५० | २९९ |
| १९३ | बावी आ. | ३६२ | ४०१ |
| १९४ | बावी आ. | ३३० | ३५३ |
| १७१ | तावडी | ४३५ | ३९० |
| १७० | शेलगाव मा. | ४३२ | ४५३ |
| १८९ | तांदुळवाडी | ३३९ | ३०३ |
| १६८ | सौंदरे | ५५५ | ५०६ |
| १६९ | सौंदरे | ४२१ | ४४४ |
| १९० | महागाव | ४०१ | ४३० |
| २२८ | मळेगाव | २९६ | ३६४ |
| २२९ | मळेगाव | २९९ | ३०२ |
| २३० | मळेगाव | २५६ | २४७ |
| १९१ | पिंपळगाव पा. | ३४३ | ४७४ |
| २२४ | साकत | ३२६ | ४३६ |
| २२५ | साकत | ३३९ | ५०७ |
| १९५ | कळंबवाडी पा. | ३२५ | ४१८ |
| २०३ | दडशिंगे | ३०७ | ४४२ |
| २४८ | वैराग | ४६६ | ४९५ |
| २४९ | वैराग | २९४ | ४७५ |
| २५० | वैराग | २७९ | ४६५ |
| २५१ | वैराग | १८१ | ३९७ |
| २५२ | वैराग | ३६३ | ५२२ |
| २५३ | वैराग | ३२० | ४९५ |
| २५४ | वैराग | ३१९ | ४६१ |
| २५५ | वैराग | ३६५ | ५२५ |
| २५६ | वैराग | ४०९ | ४१३ |
| २५७ | वैराग | २८० | ४४५ |
| २५८ | वैराग | ३०६ | ३८७ |
| २५९ | वैराग | १६८ | २९३ |
| २६० | वैराग | १८९ | २०४ |
| २६१ | वैराग | ३०१ | ४९३ |
| २६२ | वैराग | १८२ | ५१४ |
| ३२५ | शेळगाव आर. | ४७३ | ४०४ |
| ३२६ | शेळगाव आर. | ३३० | ४६४ |
| ३२७ | शेळगाव आर. | ३९७ | ४३३ |
| ३१६ | धामणगाव दु. | २३२ | ३७९ |
| ३१७ | धामणगाव दु. | २६२ | ३४० |
| ३१८ | धामणगाव दु. | २५६ | २७६ |
| ३१४ | हत्तीज/चिंचखोपण/हिंगणी | २५१ | ३४८ |
| ३१५ | हत्तीज | २६२ | २४६ |
| ३१२ | ज्योतिबाचीवाडी | ५१७ | ३९५ |
| ३१३ | ज्योतिबाचीवाडी | ४३४ | २७२ |
| ३११ | अंबाबाईचीवाडी | ३३१ | ३२१ |
| ३२८ | सारोळे | ४५९ | २६५ |
| ३२९ | सारोळे | ३५४ | २२६ |
| ३३१ | कासारी | ३२१ | ४८२ |
| ३३० | भांडेगाव | २३२ | २२९ |
| ३१० | आंबेगाव | ३२० | १५७ |
| ३१९ | राळेरास | २९९ | ४१० |
| ३२० | राळेरास | ३०९ | ३७३ |
| २८४ | सर्जापूर | ३३३ | ३५० |
| **बूथ क्र.** | **बार्शी शहर** | **राऊत** | **सोपल** |
| ६० | कन्या प्रशाला | ३६८ | ३७४ |
| ६१ | न.पा. शाळा | २४५ | ५२२ |
| ६२ | यशवंतराव चव्हाण शाळा | ४८८ | ३६९ |
| ६३ | शाळा नं. १५ | ४०० | ४८६ |
| ६४ | शाळा नं. १५ | ४१२ | ३५१ |
| ६५ | शेठ अगरचंद कुंकूलोळ | २८६ | ५६० |
| ६६ | जवाहरलाल नेहरू शाळा | ३८८ | ३३५ |
| ६७ | जवाहरलाल नेहरू शाळा | २४१ | ५०९ |
| ६८ | जवाहरलाल नेहरू शाळा | ३०६ | ४६८ |
| ६९ | जवाहरलाल नेहरू शाळा | ३१२ | ४३० |
| ७० | जवाहरलाल नेहरू शाळा | ३०४ | ३८१ |
| ७१ | जवाहरलाल नेहरू शाळा | ३३५ | ४९८ |
| ७२ | भैरवनाथ शिक्षण संस्था | २६७ | ३८९ |
| ७३ | भैरवनाथ शिक्षण संस्था | ३७२ | ४०५ |
| ७४ | अध्यापक विद्यालयड डी.एड्. | २८३ | ३५० |
| ७५ | ममता स्कूल उत्तर | ३९० | ५०४ |
| ७६ | ममता प्रायमरी स्कूल | ३३३ | ४५० |
| ७७ | अध्यापक विद्यालय डी.एड्. | ३४० | ४५७ |
| ७८ | अण्णाभाऊ साठे शाळा | ३५१ | ३७३ |
| ७९ | अण्णाभाऊ साठे शाळा | ३५९ | २९८ |
| ८० | अण्णाभाऊ साठे शाळा | २९५ | ५१० |
| ८१ | भाऊसाहेब विद्यालय | २६८ | ३७१ |
| ८२ | भाऊसाहेब विद्यालय | १९१ | ३०१ |
| ८३ | भाऊसाहेब विद्यालय | ३९० | ४१८ |
| ८४ | भाऊसाहेब विद्यालय | ३३० | ५०२ |
| ८५ | भाऊसाहेब विद्यालय | ४०० | २५४ |
| ८६ | सिल्वर ज्युबिली प्रशाला | ६८४ | २१४ |
| ८७ | सिल्वर ज्युबिली प्रशाला | ७३४ | १३६ |
| ८८ | सिल्वर ज्युबिली प्रशाला | ४३८ | १६९ |
| ८९ | सिल्वर ज्युबिली प्रशाला | २३२ | १८७ |
| ९० | सिल्वर ज्युबिली प्रशाला | ५७९ | ३२७ |
| ९१ | सिल्वर ज्युबिली प्रशाला | ३९१ | ३२३ |
| ९२ | सिल्वर ज्युबिली प्रशाला | ४२८ | २२८ |
| ९३ | अगरचंद कुंकूलोळ | २०४ | ४९९ |
| ९४ | अगरचंद कुंकूलोळ | २५० | ६०७ |
| ९५ | अगरचंद कुंकूलोळ | २५५ | ४३० |
| ९६ | राजमाता शाळा नं. १ | २५६ | ४४५ |
| ९७ | महावीर भगवान खोली १ | १३८ | ३९९ |
| ९८ | महावीर भगवान खोली २ | २०६ | ४६० |
| ९९ | महावीर भगवान क्र. २ | २५२ | ६३३ |
| १०० | महावीर भगवान क्र. २ | ३४२ | ४५९ |
| १०१ | महावीर भगवान क्र. २ पूर्व | ४४७ | ४४९ |
| १०२ | लोकमान्य टिळक | २५७ | ५३० |
| १०३ | लोकमान्य टिळक | ३७६ | ४७८ |
| १०४ | गुजराथी शाळा उत्तर | २१५ | २२३ |
| १०५ | गुजराथी शाळा दक्षिण | २०३ | २५७ |
| १०६ | गुजराथी शाळा | ३४६ | ३९२ |
| १०७ | गुजराथी शाळा | ३३१ | ५१७ |
| १०८ | गुजराथी शाळा | ४०० | ५१७ |
| १०९ | गुजराथी शाळा | ३२८ | ४४० |
| ११० | गांधी छात्रालय | ३७२ | ४०३ |
| १११ | गांधी छात्रालय | ३१८ | ५५६ |
| ११२ | शाळा क्र. ८ | ४६५ | ४२५ |
| ११३ | शाळा क्र. ८ | ३३९ | ४२३ |
| ११४ | साधना कन्या प्रशाला | ३४५ | ४१८ |
| ११५ | साधना कन्या प्रशाला | ४०५ | ४९८ |
| ११६ | साधना कन्या प्रशाला | २९२ | ४८५ |
| ११७ | शिशुविहार सुलाखे हाय. | २८१ | ४२० |
| ११८ | शिवाजी कॉलेज | ३१० | ४३९ |
| ११९ | शिवाजी कॉलेज | २९४ | ४१० |
| १२० | शिवाजी कॉलेज | ११६ | १७७ |
| १२१ | जिजामाता शाळा | ३३० | ४३४ |
| १२२ | जिजामाता विद्यामंदिर | ३९१ | ४५२ |
| १२३ | जिजामाता विद्यामंदिर | ३७७ | ३९२ |
| १२४ | महात्मा फुले विद्यामंदिर | ३८८ | ४२२ |
| १२५ | राजश्री शाहू महाराज | १६४ | १६८ |
| १२६ | महात्मा फुले विद्यामंदिर | ४१६ | ३९९ |
| १२७ | महात्मा फुले विद्यामंदिर | ३९३ | ४१३ |
| १२८ | महात्मा फुले विद्यामंदिर | ३४४ | ४४६ |
| १२९ | माजी सैनिक | ३०६ | ४२९ |
| १३० | जिजामाता विद्यामंदिर | ३१९ | ३४९ |
| १३१ | सोजर खोली क्र. २ | २३८ | २४८ |
| १३२ | सोजर खोली क्र. ३ | ४०० | ४६२ |
| १३३ | सोजर खोली क्र. ४ | २३४ | ३२० |
| १३४ | सोजर खोली क्र. ५ | ३०५ | ३८३ |
| १३५ | लालबहादूर शास्त्री शाळा | २८७ | ६२७ |
| १३६ | कुर्बान हुसेन सभागृह | २८१ | ७२० |
| १३७ | अभिनव शाळा | २२१ | ४५४ |
| १३८ | अभिनव शाळा पश्चिम | २१३ | ४२५ |
| १३९ | अभिनव शाळा पश्चिम | २७४ | ५५९ |
| १४० | अभिनव शाळा पश्चिम | २२६ | ४१५ |
| १४१ | अभिनव शाळा पश्चिम | २५३ | ३५३ |
| १४२ | अभिनव शाळा | १९१ | २६३ |
| १४३ | अभिनव शाळा | २२९ | ४५८ |
| १४४ | शाळा क्र. ६ शाहू महाराज | ३०७ | ४१० |
| १४५ | शाळा क्र. ६ शाहू महाराज | २२५ | ३४९ |
| १४६ | शाळा क्र. ६ शाहू महाराज | १९२ | ४४२ |
| १४७ | शाळा क्र. ६ शाहू महाराज | ३४३ | ४४४ |
| १४८ | लालबहादूर शाळा क्र. ४ | २४६ | ४५८ |
| १४९ | लालबहादूर शाळा क्र. ४ | ३४९ | ११५ |
| १५० | कन्या प्रशाला | ३४९ | ३५० |
| १५१ | मॉडेल हायस्कूल | ३६२ | १८९ |
| १५२ | मॉडेल हायस्कूल पूर्व | ४०० | २८६ |
| २२ | आगळगाव | ४५७ | ४७६ |
| २३ | आगळगाव | ४२३ | ३४९ |
| २४ | आगळगाव | ३६३ | ५०९ |
| २० | बाभुळगाव | ३५२ | ३३७ |
| २१ | बाभुळगाव | ३२१ | २७८ |
| ५७ | जामगाव (आ) | ४०५ | ३२४ |
| ५८ | जामगाव (आ) | ५१२ | ३०७ |
| ६ | उंबर्गे | ३६८ | २७३ |
| ७ | उंबर्गे | ४०० | २३५ |
| ११ | चुंब | २४४ | ३०७ |
| १२ | चुंब | ३१८ | २१६ |
| ४ | मांडेगाव | २९८ | २३३ |
| ५ | मांडेगाव | २४० | २३१ |
| ३६ | कुसळंब | ५९३ | ५६२ |
| १० | कोरेगाव | ४६४ | ४९० |
| १३ | कळंबवाडी आ. | ४११ | ३९१ |
| ९ | खडकोणी | ३३९ | २९० |
| ५६ | अरणगाव | ४८७ | ११६ |
| ८ | भानसाळे | १८४ | १२२ |
| ३५ | बानेवाडी | ४२८ | ३१० |
| ४६ | पांगरी | ३९८ | ३५९ |
| ४७ | पांगरी | ४५९ | ४०४ |
| ४८ | पांगरी | ४३९ | ४५८ |
| ४९ | पांगरी | ३२६ | ३४१ |
| ५० | पांगरी | ४६४ | ४४१ |
| १५ | चारे | २४६ | ४४१ |
| १६ | चारे | २२४ | ४२० |
| १७ | काटेगाव | २८२ | ४६३ |
| १८ | काटेगाव | २१० | ३२५ |
| ३९ | शिराळे | २४२ | २३२ |
| ४० | शिराळे | २८१ | ३०० |
| १९ | बोरगाव खु | ४१४ | ४६८ |
| ४२ | पिंपळवाडी | ४७३ | ३६२ |
| ३८ | पाथरी | ४३७ | ५१८ |
| ४१ | वालवड | २५२ | २६४ |
| १४ | धामणगाव आ. | ३२२ | १८७ |
| ३७ | धानोरे | ३८५ | ३२४ |
| २८१ | सासुरे | ४५० | ३२३ |
| २८२ | सासुरे | ४३७ | ३३० |
| २८३ | सासुरे | २८८ | ३४३ |
| ३२१ | दहिटणे | ३८५ | ४६० |
| ३२२ | दहिटणे | ११९ | १७१ |
| ३२३ | मुंगशी वा | ३३८ | ३०० |
| ३२४ | मुंगशी वा | २२१ | ३२३ |
| २७७ | तडवळे | २१६ | ४०४ |
| २७८ | तडवळे | ३४९ | २४६ |
| २७९ | तडवळे | २५२ | ३३६ |
| २७५ | यावली | २७३ | ३९९ |
| २७६ | यावली | ३७७ | २५९ |
| २८० | ढोराळे | ५३१ | ४३० |
| २१९ | उंडेगाव | ४८० | ४८५ |
| २१८ | रस्तापूर | ३८४ | २४४ |
| २२० | काळेगाव | ३६६ | २५९ |
| २२१ | काळेगाव | ३३१ | २२५ |
| २६६ | इर्ले | ३०६ | ३५८ |
| २६७ | इर्ले | २३१ | २३१ |
| २६५ | इर्लेवाडी | १४२ | २६९ |